<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. –०२</u>

<u>नि.फौ.ख.क्र.२९६/२०१९</u>
**सरकार विरुध्द शारीक व वगैरे**
**निशाणी – ०८**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**माझे नांव – रूपेश भीमराव दुर्गे**
**वय – अंदाजे ४८ वर्ष, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.नं.२४१०**
**राहणार – टेका नाका, नागपूर**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती माधवी एन. जुमळे यांच्या कडून –**

दिनांक ०७/०५/२०१९ रोजी मी पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोलीस नायक या पदावर कार्यरत होता. त्यादिवशी मला रात्री ९.०० ते ०८/०५/२०१९ चे सकाळी ९.०० अशी रात्रपाळी डयुटी होती. त्यादिवशी काही लोक जनावरांना आणून ड्रॅगन पॅलेस च्या पाठीमागे कत्तल करण्यसाठी जमा होत आहे अशी माहिति मिळाली. मी, पोलीस हवालदार ब.नं.३७८१, पोलीस शिपाई ब.नं.७२०५ असे घटनास्थळी गेलो. तेथे एक बोलेरो गाडी अंधारात उभी होती व एक इसम गाडी मधून जनावरे काढून झाडी झुडपात बांधत होते. त्यांना आम्ही ताब्यात घेतले व इतर स्टॉप बोलाविला. त्या गाडी मध्ये निर्दयरित्या जनावरे कोंबून भरली होती. त्या मध्ये गायी, बैल अशी एकुण ३७ जनावरे होती. त्या जनावरांन मध्ये दोन जनावरे मृत अवस्थेत होती. एक खाजगी गाडी मागवून त्या जनावरांना राधाकृष्ण गोशाळा येथे पाठविले. तेथे पंचनामा तयार केला. मला आता तो पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचाची सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी ०९</u>** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपींविरूध्द फिर्याद दिली. मला ती फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **<u>निशाणी १०</u>** देण्यात येते. मला आता छापील फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. छापील फिर्यादला **<u>निशाणी ११</u>** देण्यात येते. पुढील तपास पीएसआय राव यांनी केला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो, ते न्यायालयात हजर आहेत.
**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एम.एस. शर्मा यांच्या मार्फत सुरु –**

हे म्हणणे खरे आहे की आमच्या दिवस व रात्रपाळी अश्या दोन शिफ्ट असतात. हे म्हणणे खरे आहे की हजर होते वेळी आमची हजेरी घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की मी त्यादिवशी डयुटीवर हजर होतो हे दाखविण्यासाठी कोणताही कागद दोषारोप पत्रासोबत लावला नाही. हे म्हणणे खरे आहे की ड्रॅगेन पॅलेस परिसरात लोकांची घरे आहेत. साक्षीदार सांगतो की कब्रस्थान पासून दुर

आहेत. मुस्लीम समाजात रात्री मयत झाल्यास त्याचा अंत्यविधी रात्री पण केला जातो काय याची मला माहिती नाही. मी जबाब देतांना इतर स्टॉफ ला बोलाविले असे सांगितले होते ते माझ्या फिर्याद मध्ये नमूद नाही असे का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी त्यादिवशी डयुटीवर नसल्याने तसा कागद नाही किंवा स्टॉफला बोलाविल्याबाबत माझ्या फिर्याद मध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की गोवंशीय जनावरांचे प्रकार असतात. हे म्हणणे खरे आहे की त्या जनावरांचे रंग वेगवेगळे असतात.

प्रश्न – जनावरे कोणत्या जातीचे व रंगाचे होते याचा उल्लेख फिर्याद मध्ये नाही.

उत्तर – तसा उल्लेख पंचनाम्यामध्ये आहे.

हे म्हणणे खरे आहे की माझ्या फिर्याद मध्ये त्या जनावरांमध्ये किती बैल व किती गाय याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की असा कोणताही प्रकार घडला नसल्याने जनावरांचा उल्लेख फिर्याद मध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की मी कथन करीत असल्याप्रमाणे प्रकार घडल्यास वरिष्ठांची किंवा न्यायालयाची जनावरे दुसरी कडे वाहतुक करण्यासाठी परवानगी लागते. हे म्हणणे खरे आहे की तशी परवानगी या प्रकरणात नाही. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना घडली नसल्याने तशी परवानगी नाही.

घटनास्थळाच्या चुर्तुरसिमा आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा मी केला नसल्याने व घटनास्थळावर मी गेलो नसल्याने मी चुर्तुरसिमा सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की कत्तलीकरीता काही औजारे लागतात.

प्रश्न – तुमच्या पंचनाम्यात व फिर्याद मध्ये औजारे जप्त केल्याबाबत नमूद नाही

उत्तर – जनावरे कत्तलीकरीता घेऊन जाण्यासाठी आरोपीं लोक जनावरे जमा करत होती.

हे म्हणणे खरे आहे की कत्तल करण्यासाठी तशी खोली बनविलेली असते. हे म्हणणे खरे आहे की तश्या खोलीचा उल्लेख पंचनाम्यात व फिर्याद मध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की तेथे जनावरे कत्तल करण्यासाठी गोळा करीत नसल्याने तसा खोलीचा उल्लेख पंचनाम्यात व फिर्याद मध्ये नाही. पंचनाम्याला किती वेळ लागला व किती वाजता केला हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा पोलीस ठाण्यात बसून लिहण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की पंचाना बोलाविण्याकरीता समन्स किंवा नोटीस दयावी लागते. हे म्हणणे खरे आहे की समन्स किंवा नोटीसचा कागद दोषारोप पत्रात नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचाना पंचनाम्याकरीत बोलाविले नसल्याने तसा समन्स व नोटीस दोषारोप पत्रात दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यावरील पंचाच्या सहया मी पोलीस ठाण्यात घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की पंचनाम्यावरील पंच माझ्या दुस–या केस मध्ये पंचनाम्या मध्ये पंच आहेत.

हे म्हणणे खरे आहे की कामठी मध्ये चौका चौकात दुधाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की डेअरी वाले गायी व म्हशीचे दुध काढून विकतात. हे म्हणणे खरे आहे की जनावरांना

चरण्याकरीता मोकळ्या जागेत गवत असलेल्या ठिकाणी सोडतात. हे म्हणणे खरे आहे की कामठी गावाला लागून आजूबाजूला शेतीचा व्यवसाय करणारे लोक आहेत. हे म्हणणे खरे आहे की शेतीचा व्यवसाय करणारे लोक बैल व गाय पाळतात. बोलेरो वाहनात ३७ जनावरे असल्याबाबत दाखविणारा फोटो व इतर पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला महिन्याला काही प्रकारच्या केसेसचा कोटा पूर्ण करावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की मी तो कोटा पूर्ण करण्याकरीता इतर स्टॉफ सोबत संगनमत करून खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की वाहन रिकाम्या अवस्थेत घरून जप्त केली. हे म्हणणे खरे आहे की न्यायालयात आरोपी नेहमी मागे उभे राहतात याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे आरोपीं न्यायालयात हजर आहे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की कोटा पूर्ण करण्यासाठी आरोपीं विरूध्द खोटी केस दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपासणी नाही**.

वा.दा.ब.अ.क.के.

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2024.07.24 17:22:37 +0530

कामठी
दिनांक २२/०७/२०२४

( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी